# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 06 January 2026
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०६ जानेवारी २०२६ सायंकाळी ६.१०**

********

- महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांच्या प्रचाराला वेग
- सीआरएस सॉफ्टवेअरच्या तपासणीसाठी राज्यसरकारकडून विशेष तपास पथकाची नियुक्ती
- राज्यभरात दर्पणदिन साजरा; मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे पत्रकार पुरस्कार जाहीर

आणि

- माजी केंद्रीय मंत्री सुरेश कलमाडी यांचं निधन

********

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांच्या प्रचाराने वेग घेतला आहे. निवडणुकीसाठी प्रशासनाचीही तयारी सुरू आहे. मतदारांमधे मतदानविषयक जागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत असून, मतदान आणि मतमोजणीसाठी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षणवर्ग सुरू आहेत.

जळगाव इथे निवडणुकीसाठी मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाचा पहिला टप्पा पार पडला. या प्रशिक्षणाला उपस्थित न राहिलेल्या ९९ कर्मचाऱ्यांविरुद्ध निलंबनासह गुन्हे दाखल करण्याचा इशारा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांनी दिला आहे.

मतदारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी आज लातूर शहरात 'वॉकेथॉन' फेरी काढण्यात आली. लातूर शहर महानगरपालिका आणि रोटरी क्लब यांच्यातर्फे संयुक्तपणे घेतलेल्या या फेरीत, जनजागृतीपर फलक आणि घोषणांचा वापर

करण्यात आला. महानगरपालिकेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांसह नागरिकांनीही या फेरीत मोठ्या संख्येनं सहभागी होत, 'मतदान हा आपला हक्क' असल्याचा संदेश दिला.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील संवेदनशील भागांसह विविध परिसरात पोलीस विभागाचं पथसंचलन केलं जात आहे. सर्वच पक्षांचे स्थानिक नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते जोमाने प्रचाराला लागले आहेत. पदफेऱ्या, दुचाकी फेरी, कॉर्नर बैठका, वगैरे पद्धतीने सकाळपासूनच प्रचार सुरू होत असल्याने आता प्रचाराला रंगत आलेली दिसून येत आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आज छत्रपती संभाजीनगरच्या विकासाचा आपला जाहीरनामा आज प्रसिद्ध केला.

****

धुळे महापालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी आज भारतीय जनता पक्षाच्या वतीनं धुळे शहरात मुख्यमंत्री भाजप नेते फडणवीस यांची विजय संकल्प सभा झाली. तर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नागपुरात पत्रकार परिषद घेऊन मनपा निवडणुकीत मोठ्या विजयाचा विश्वास व्यक्त केला. मतदानाच्या नऊ तास आधीपर्यंत प्रचार करण्याची परवानगी राजकीय पक्षांना दिल्याबाबत त्यांनी निवडणूक आयोगावर टीका केली. ज्या ठिकाणी बिनविरोध निवडी झाल्या आहेत त्या ठिकाणी नोटाच्या पर्याय असलेली ईव्हीएम घेऊन मतदान घ्यावं, अशी मागणीही सपकाळ यांनी यावेळी केली.

****

नाशिकचे माजी महापौर, मनसे नेते अशोक मुर्तडक आणि माजी महापौर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे दशरथ पाटील यांनी आज मुंबईत शिवसेनेत प्रवेश केला. पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचं पक्षात स्वागत केलं.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मुंबईतील माजी नगरसेवक संतोष धुरी यांनी आज भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. मुंबई भाजपाध्यक्ष अमित साटम यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेशाचा सोहळा पार पडला.

****

सीआरएस अर्थात नागरी नोंदणी प्रणालीच्या सॉफ्टवेअरमध्ये अनियमितता आढळल्याप्रकरणी राज्य सरकारनं एका विशेष तपास पथकाची नियुक्ती केली आहे. यवतमाळ जिल्ह्यातल्या शेंदूरसनी, या तेराशे लोकसंख्या असलेल्या गावात जन्म

आणि मृत्यूच्या २७ हजार नोंदी आढळल्याचं प्रकरण उघडकीस आलं आहे, या प्रकरणी हे पथक या आठवड्यात शेंदूरसनी इथं भेट देऊन नोंदणी प्रणालीत काय चूक झाली याचा शोध घेणार आहे. याप्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून, यवतमाळ पोलीस अधिक तपास करत आहेत.

****

वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी आज नवी दिल्लीत, पोषण सुरक्षा आणि कुपोषण निवारणात, सामाजिक उत्तरदायित्व निधी- सीएसआर ची भूमिका, या विषयावरच्या संमेलनाचं उद्घाटन केलं. कुपोषण निर्मुलनासाठी त्याची मूळ कारणं संपुष्टात आणण्याची गरज असून, याबाबतीत केंद्र सरकार व्यापक दृष्टीकोनासह काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं. सामाजिक उत्तरदायित्व निधी कुपोषण निर्मूलनात महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतो, असं मतही गोयल यांनी यावेळी व्यक्त केलं.

****

राज्यभरात दर्पणदिन आज साजरा झाला. मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे वृत्तपत्र सुरू केल्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. यानिमित्तानं पत्रकारिता महाविद्यालयांसह विविध संस्था आणि संघटना विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून दर्पणदिन साजरा करत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन केलं असून, राज्यातल्या पत्रकारांना शुभेच्छा दिल्या आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन केलं.

****

मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे या वर्षीचे उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार आज जाहीर झाले. 'कृ. पां. सामक' हा प्रतिष्ठेचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार प्रकाश अकोलकर यांना जाहीर करण्यात आला आहे. राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारासाठी `लोकसत्ता` चे प्रतिनिधी अशोक अडसूळ यांची तर वृत्तवाहिनीसाठी राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारासाठी 'इंडिया टुडे-आज तक' ग्रुपचे पुणे ब्युरो चीफ ओमकार वाबळे यांची निवड करण्यात आली आहे. वार्ताहर संघाच्या सदस्यांसाठी असलेल्या उत्कृष्ट पुरस्कार 'ॲग्रोवन'चे बाळासाहेब पाटील यांना जाहीर झाला आहे. लवकरच या पुरस्कारांचं वितरण करण्यात येणार आहे.

****

माजी केंद्रीय मंत्री सुरेश कलमाडी यांचं आज पहाटे पुण्यात निधन झालं. ते ८२ वर्षांचे होते. भारतीय हवाईदलात वैमानिक म्हणून सेवा बजावताना त्यांनी १९६५ आणि १९७१च्या युद्धात प्रत्यक्ष भाग घेतला होता. निवृत्तीनंतर ते राजकारणात सक्रीय झाले. १९८२ ते १९९६ अशी सलग १४ वर्षं, आणि नंतर १९९८ ते २००४ या कालावधीत ते राज्यसभेचे सदस्य होते. १९९६ मधे ते लोकसभेत निवडून गेले होते. राष्ट्रकुल स्पर्धांच्या आयोजनात कलमाडी यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले, मात्र सक्तवसुली संचालनालयानं गेल्या वर्षी दिलेल्या अहवालानंतर त्यांची आरोपातून मुक्तता झाली होती.

कलमाडी यांच्या निधनाबद्दल राजकीय वर्तुळातून दुःख व्यक्त केलं जात आहे.

****

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या निवडणुकीला मुंबई उच्च न्यायालयानं पुढच्या आदेशापर्यंत स्थगिती दिली आहे. विद्यमान अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्या नातेवाईकांसह ४०० नव्या सदस्यांना संघटनेत घेण्याच्या प्रक्रियेवर न्यायालयानं प्रश्नचिन्ह उपस्थित करत, या प्रक्रियेत न्यायालयानं दखल देण्याची गरज असल्याचं मत मांडलं. ही निवडणूक आज नियोजित होती. सर्व संबंधित पक्षांनी येत्या ३ फेब्रुवारीपर्यंत शपथपत्राद्वारे उत्तर द्यावं, असे निर्देश न्यायालयानं दिले. या प्रकरणाची पुढची सुनावणी येत्या ४ फेब्रुवारीला होणार आहे.

****

राज्यातलं महसूल प्रशासन अधिक सक्षम, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीनं राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी एक अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत राज्यातल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे अभ्यास गट देशातल्या विविध राज्यांना भेट देऊन तिथल्या महसूल विभागांनी राबवलेल्या यशस्वी योजनांचा आणि कामकाज पद्धतींचा अभ्यास करणार आहेत. नागरिकांना सुलभ, जलद आणि पारदर्शक सेवा देण्यास यामुळे मदत होणार असल्याचं महसूल विभागानं म्हटलं आहे.

****

केंद्र सरकारने नुकतंच विकसित भारत रोजगार आणि उपजिविका हमी ग्रामीण हे विधेयक संमत केलं आहे. या योजनेत २६५ कामांचा समावेश केल्याची माहिती,

हिंगोली जिल्ह्याच्या वसमत तालुक्यातल्या गिरगाव इथले सरपंच प्रमोद नारदे यांनी दिली. ते म्हणाले –

**बाईट – प्रमोद नारदे**

****

राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानाअंतर्गत छत्रपती संभाजीनगर इथं कन्नड, खुलताबाद, गंगापूर आणि वैजापूर तालुक्यातल्या कृषी सखींसाठी प्रशिक्षण शिबीर घेण्यात आलं. एमजीएम कृषी विज्ञान केंद्र आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा– आत्मा यांच्यावतीनं घेतलेल्या या शिबीरात नैसर्गिक शेतीबद्दल मार्गदर्शन करण्यात आलं.

****

मलेशियात क्वालालंपूर इथे सुरू असलेल्या मलेशिया खुल्या सुपर सेव्हन फिफ्टी बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या लक्ष्य सेननं सिंगापूरच्या जिया हेंग जेसन तेह ला हरवून पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. दुसरीकडे महिला एकेरीत भारताच्या मालविका बनसोडचा पहिल्या फेरीत पराभव झाला.

****

राज्यात आज गोंदिया जिल्ह्यात सर्वात कमी सात अंश तर नागपुरात साडे सात अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. जळगाव साडे दहा, अहिल्यानगर साडे अकरा, तर नाशिक जिल्ह्यात मालेगाव इथं १२ पूर्णांक दोन दशांश सेल्सियस तापमान नोंदवलं गेलं. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर तसंच परभणी इथं सुमारे साडे तेरा अंश तर नांदेड इथं साडे बारा अंश सेल्सियस तापमान नोंदवलं गेलं.

****